सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८९ ठ. क्र.१६१
दि. २८/८/१५ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



१) सोलापूर महानगरपालिकेचे वतीने शहरातील व हद्दवाढ भागातील मिळकतींचा जी.आय.एस.प्रणालीद्वारे सर्व्हे करुन नोंदी घेण्याकरिता इ-टेंडरिंग करण्यांत आले होते. यामध्ये स्टी सॅलिट व फायबर टेक सिस्टीम या दोन कंपन्यांनी भाग घेतला होता. यात टी सॅलिट लिमिटेड कंपनीने १,१५,५५,६४७/ तर फायबर टेक सिस्टिम यांचे ५,३६,२३,३८७/ असे दर दिलेले होते. या इ-टेंडरींगमध्ये आलेल्या दराबाबत वाटाघाटीसाठी तत्कालीन आयुक्त श्री. चंद्रकांत गुडेवार यांनी बोलविले होते. हे टेंडरींग डॉक्युमेंट पहाता र.रु. १,१५,५५,६४७/ या रकमेला आळा करुन त्याच्यासमोर ६,५५,९५,००० / अशी रक्कम घातली आहे.या रक्कमेमध्येही ५ या आकडयाऐवजी खाडाखोड करुन ६ असे नमूद केल्याचे स्पष्ट दिसत आहे. वास्तविक इ-टेंडरींगमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड नियमानुसार करता येत नाही. याबाबतचा आक्षेप देखील मुख्यलेखापरिक्षक यांनी नोंदविलेला आहे. या इ टेंडरींगमध्ये खाडाखोड असल्याने फेर टेंडर काढावे असेही त्यांनी सुचीत केले आहे. असा आक्षेप त्यांनी घेतला असतांनाही त्याकडे जाणीवपुर्वक दुलर्क्ष करुन टी सॅलिट कंपनीने १,१५,५५,६७४/ चे दर दिले असतांना, त्यामध्ये आकडयात खाडाखोड करुन ६,१५,५५,६७४/ आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन मक्ता दिल्याचे प्रकरणातील कागदपत्रे पहाता दिसून येत आहे. यामध्ये ५,००,००,०००/ पेक्षाही जादा रक्कम देण्याचा निर्णय संशयास्पद असून, मुख्यलेखापरिक्षक यांचा आक्षेप व नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीरपणे दिलेल्या मक्त्यासंदर्भात चौकशी होणे गरजेचे व न्यायाचे आहे.

२) सोलापूर शहराचे कॉंप्रेसिव्ह मोबॅलिटी प्लॅन सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार समितीच्या नेमणुकीकामी संबंधित अर्बन मास ट्रान्झिट कंपनी लिमिटेड यांच्या निविदेचे दर र.रु. ४३,४८,३३२/ यास स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रकरण स्थायी समितीकडे दि. २१-११-१४ रोजी पाठविण्यांत आले.७३(क)मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समितीने लगतच्या सभेच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत म्हणजे दि. १२-१२-२०१४ रोजी प्रकरणी निर्णय घेऊन २० टक्के खर्चाच्या अनुषंगाने मुख्यलेखापाल यांचा स्पष्ट अभिप्राय घेऊन प्रकरण फेर सादर करणेस मान्यता दिली असतांना तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन प्रकरण फेर सादर न करता चुकीच्या पध्दतीने मानीव मंजूरी गृहित धरुन संबंधितांचा मक्ता मंजूर केलेला आहे. व स्थायी समितीचा अधिकार स्वतः वापरलेला आहे. ही बाब अत्यंत गैर व बेकायदेशीर आहे.

३) महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे संरक्षक भित बांधणेसाठी तत्कालीन आयुक्त यांनी र.रु. ८१,३३,५१८/ इतक्या खर्चाचा प्रस्ताव महानगरपालिकेचे मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे न पाठविता अथवा मुख्यलेखापाल यांचा अभिप्राय न घेता पाठविलेला आहे. सदरची जागा महानगरपालिकेची नसतांना, एवढी रक्कम खर्च केली असल्याचे निदर्शनास आले आहे. र.रु. ८१,३३,५१८/ एवढी रक्कम खर्च करतांना , मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय असणे अत्यंत आवश्यक आहे. एवढया मोठया रक्कमेचे काम ६७(३)(क) खाली टेंडर न काढता स्वतःच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन व भिंत बांधणेची कोणतीही गरज नसतांना व या जागेची मालकी महानगरपालिकेची नसतांना सदर जागेवर वॉल कंपाऊंड बांधत असतांना ८० टक्के रक्कम ॲडव्हान्स दिलेली आहे. या प्रकरणात कोणत्याही कायदेशीर बाबीची पुर्तता केलेली दिसून येत नाही.

याबाबत कोणत्याही प्रकारचे टेंडर न काढता आपल्या मर्जीतील कॉंट्रॅक्टरला हे काम देण्यांत आले आहे. व यासाठी सुरुवातीलाच ८० टक्के ॲडव्हान्स देण्यांत आलेली आहे. ही बाब बेकायदेशीर आहे.

४) सोलापूर महानगरपालिचे परिवहन विभागासाठी जेएनएनयुआरएम या योजनेतील २०० बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव अत्यंत घाईघाईने तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी परिवहन समिती व सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करुन घेतला तसेच २०० बसेससाठी जे टेंडर काढले त्या टेंडरची रक्कम ११२,११,८९,९६५/ इतकी होती. या योजनेअंतर्गत ८५ कोटी ८० लाखाचे अनुदान मंजूर करण्यांत आले होते. असे असतांना ११२,११,८९,९६५/ इतक्या खर्चाचे टेंडर मान्य करण्यांत आले. ही योजना राबवित असतांना मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी दि. २७-१-२०१४ रोजी १ ते ६ आक्षेप घेतले होते. त्याकडे डोळेझाक करुन तत्कालीन आयुक्त श्री. चंद्रकांत गुडेवार यांनी स्वतःच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन ,ही प्रक्रीया पुढे रेटली आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी कोणतीही सक्षम मान्यता नसतांना ६४,८४,४४,४००/ चा देखभाल दुरुस्तीचे टेंडर काढले. त्यावेळी मा.परिवहन समितीने प्रसंगावधान ओळखून ते टेंडर अनावश्यक व अनाठाई वाटल्याने नामंजूर केले. ते जर टेंडर मंजूर केले असते तर महानगरपालिकेवर फार मोठे संकट आले असते. वास्तविक अशा पध्दतीचे टेंडर करतांना सक्षम मान्यतेची आवश्यकता असते. एवढया मोठया रक्कमेची तरतूद नसतांना सक्षम मान्यता न घेता टेंडर काढणे तीन वर्षाची सर्व्हीस वॉरंटी असताना ,सर्वसाधारण सभेचा ठरावाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन ही प्रक्रिया पुर्ण केली. तसेच या मध्ये तिन्ही ज्या टेंडर धारकांनी भाग घेतला त्यांना वाटाघाटीसाठी बोलाविले होते. असे म्हटले आहे. प्रत्यक्षात काय वाटाघाटी झाल्या याची प्रकरणामध्ये कुठलेही कागदपत्रे नाहीत. ११२ कोटी एवढया रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचे टेंडर असतांना प्रति बस ३,०००/ व ५,०००/ इतकी रक्कम कमी केल्याचे दिसून येत आहे. हे चुकीचे व बेकायदेशीर असल्याने व यामध्ये खरेदी केलेल्या बसेसपैकी २ बसेस जळाल्याने सदरची खरेदी व योजना राबविल्याचे व तांत्रिक बाबी तपासून न पाहिल्याचे स्पष्ट होत असल्याने त्याचीही चौकशी करणे योग्य व जरुरीचे वाटते.

५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना रस्ते विकास प्रकल्प योजना अंतर्गत निविदा मागविता, मटेरियल ऑन रोड साईटवर ९० टक्के ॲडव्हान्स देण्याची तरतूद करारपत्रामध्ये नसतांना , मंजूर मक्तेदार युनिटी ,इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड मुंबई यांचे क्वॉरिवरील असलेल्या मटेरियलवर ९० टक्के ॲडव्हान्स देण्यांत आला आहे. त्यामुळे या टेंडर शर्ती ,अटींचा भंग करुन, आपल्या अधिकारात चुकीच्या पध्दतीने बेकायदेशीर रित्या मक्तेदारास ॲडव्हान्स दिलेला आहे. त्यांचे पुर्वीचे आयुक्त अजय सावरीकर यांनी अशा प्रकारची रक्कम देऊ नये असा अभिप्राय दिलेला असतांनाही तत्कालीन आयुक्त श्री. चंद्रकांत गुंडेवार यांनी रक्कम दिलेली आहे.

६) सोलापूर महानगरपालिकेच्या सेवकांना गणवेष देण्यासंदर्भामध्ये ड्रेस कोड लागू करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेची किंवा स्थ्ायी समितीची मान्यता न घेता आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन प्रत्येक सेवकांच्या पगारीतून १२५०/ रुपये कपात करुन घेतले. त्याची एकूण रक्कम १२,६०,०००/ अशी असूनही याबाबत कोणत्याही प्रकारची टेंडर प्रक्रिया न राबविता, त्यांचे स्वतःचे हायकोर्टाचे वकील असलेले ॲड. सब्बन यांचे बधूचे ज्युपिटर ओव्हरसीज या फर्मला हे काम आपल्या स्वतःच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन दिला व त्यांना १२ लाखाचा ॲडव्हान्स देण्यास भाग पाडले.

७) शहरातील कचरा उचलण्याकरिता घंटा गाडया खरेदी करणेकामी मा.पदाधिकायानी केवळ खरेदीची कार्यवाही करण्यांत यावी असे पत्र दिले असता त्या पत्रास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा अवलंब न करता स्वतःच्या अधिकारात ६७(३)(क) खाली बेकायदेशीरपणे खरेदी करण्यांत आली आहे. याकरिता र.रु. १कोटी ७१लाख इतका खर्च करण्यांत आलेला आहे.वास्तविक पहाता कोणतीही आणिबाणीची परिस्थिती निर्माण झालेली नव्हती असे असतांनाही नियमाचा भंग करुन तत्कालीन आयुक्तांनी कार्यवाही केली आहे.सदरची बाब ही अत्यंत आक्षेपार्ह व बेकायदेशीर आहे.

८) सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थापकाच्या नियुक्तीचे अधिकार हे सर्वस्वी सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे असतांना आणि स्वतःला त्यांना अधिकार नसतांनाही तत्कालीन आयुक्त श्री. गुडेवार यांनी सेवानिवृत्त झालेले श्री.प्रदीप खोबरे यांची बेकायदेशीर रित्या नियुक्ती केली. वास्तविक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सेक्शन ४० खालील नियुक्ती करण्याचा अधिकार हा सर्वसाधारण सभेचा असतांना त्यानी सदरची नियुक्ती त्यांचे अधिकारात करुन सर्वसाधारण सभेचा अवमान केलेला आहे.

वरील नमूद प्रकरणे व त्यांच्या कालावधीमध्ये त्यांनी मंजूर केलेली ६७ (३) खालील बेकायदेशीर प्रकरणे या पुढे निदर्शनास येतील त्यांची संपूर्णपणे नि:पक्षपातीपणे चौकशी होणे जरुरीचे व न्यायाचे आहे.यामध्ये सोलापूर शहरातील नागरिकांनी कर रुपाने भरलेल्या पैशातून ही कामे झाली असल्याने, या प्रकरणाची नि:पक्षपातीपणे चौकशी होणे जरुरीचे आहे.

त्याकरिता मा. आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७१ अन्वये आवश्यक ती सर्व कागदपत्रे मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे १५ दिवसाचे आंत सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका